**MHRG040057522025**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १७४७/२०२५

जावेद अहमद अब्दुल हाफिज मलीक वगैरे

वि.

कोणीही नाही.

# निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता केला आहे.

०२) अर्जातील कथन असे की, **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** हे दिनांक ०३/०१/२०२४ रोजी सुप्रिम मल्टी स्पेसियालिटी हॉस्पिटल येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांची मुले आहेत. मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचे पती **पै. अब्दुल हाफिज अब्दुल हालिम मलिक** या दि.१६/१०/२०१४ रोजी उरण, ता.उरण येथे मयत झाले आहेत. मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

०३) अर्जदारांचे व्यतिरिक्त मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांस अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी अन्य कोणत्याही कोर्टात अशा प्रकारचा वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज केलेला नाही.

०४) मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांच्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

१) दुकान नं.१५, तळमजला साई किरण सहकारी गृह निर्माण संस्था म. मौजे चाणजे, ता. उरण, जि. रायगड सर्वे क्र.७९–अे हि.नं.५

२) दुकान नं.२१, तळमजला, मढवी कॉम्प्लेक्स, मौजे चाणजे, ता. उरण, जि.रायगड सर्वे क्र.५९ हि.नं.०

३) मौजे चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्वे क्र.५२, हि.नं.१क पैकी प्लॉट क्र.७ क्षेत्र २०० चौ.मी. ही मिळकत

सदरच्या अ.क्र.१ ते ३ या मिळकती वारसा हक्काने मिळालेल्या असून **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचा अविभाज्य क्षेत्रामध्ये हक्क व अधिकार आहे.

**पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचा सह मालकी हक्काची व ताबेकब्जातील अपार्टमेंट नं. बी–६, दुसरा मजला, क्षेत्र ४१२ चौ.फुट पठाण मंजिल, उरण सिटी सर्वे प्रॉपर्टी क्र.९६३/अे/१ ही मिळकत.

०५) तसेच, जाहिरनामा **(नि. क्र. ७)** प्रमाणे दिनांक १५/०१/२०२६ आणि ''रायगड नगरी'' मध्ये दिनांक १०/०१/२०२६ रोजी जाहीर नोटीस **(निशाणी क्र. २३)** दिल्यानंतर ३० दिवसांचे आत कुणीही हरकत घेतलेली नाही.

०६) **अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे–**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ याचे पुराव्याचे शपथपत्र | **९** |
| २. | मयत **पै. अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांच्या मृत्यू दाखल्याची दुय्यम प्रत | **१२** |
| ३. | मयत **पै. अब्दुल हाफिज अब्दुल हालिम मलिक** यांच्या मृत्यू | **१३** |

| | | |
|---|---|---|
| | दाखल्याची पडताळलेली प्रत | |
| ४. | दुकान नं.१५, तळमजला साई किरण सहकारी गृह निर्माण संस्था म. मौजे चाणजे, ता. उरण, जि. रायगड सर्वे क्र.७९–अे हि.नं.५ गाळ्याच्या दि.११/०४/२००२ रोजीच्या करारनाम्याची पडताळलेली प्रत | **१४** |
| ५. | दुकान नं.२१, तळमजला, मढवी कॉम्प्लेक्स, मौजे चाणजे, ता. उरण, जि.रायगड सर्वे क्र.५९ हि.नं.० गाळ्याच्या दि.२८/०९/२०१२ रोजीच्या करारनाम्याची पडताळलेली प्रत | **१५** |
| ६. | मौजे चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्वे क्र.५२, हि.नं.१क पैकी प्लॉट क्र.७ क्षेत्र २०० चौ.मी दि.२१/१२/२०१० रोजीच्या भाडेपट्टा कराराची सुची क्र.२ ची सत्यप्रत | **१६** |
| ७. | अपार्टमेंट नं. बी–६, दुसरा मजला, क्षेत्र ४१२ चौ.फुट पठाण मंजिल, उरण सिटी सर्वे प्रॉपर्टी क्र.९६३/अे/१ दि.१२/०२/१९९२ रोजीच्या नोंदणीकृत करारनाम्याची पडताळलेली प्रत | **१७** |
| ८. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण यांनी दिलेल्या दि.चौ.अर्ज क्र.१२९/२०१६ च्या वारसदाखल्याची पडताळलेली प्रत | **१८** |
| ९. | अर्जदार क्र.१ याच्या आधारकार्ड व पॅनकार्डची पडताळलेली प्रत | **१९ व २०** |

| | | |
|---|---|---|
| १०. | अर्जदार क्र.२ याच्या आधारकार्ड व पॅनकार्डची पडताळलेली प्रत | **२१ व २२** |
| ११. | पुरावा बंदची पुरशी | **२४** |

०७) अर्जात नमुद तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून असे दिसुन येते की मयत **पै.अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** या दि. ०३/०१/२०२४ रोजी मृत्यू पावलेले आहेत व अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत **पै.अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांच्या मालकीची अर्जात वर्णन केलेली मिळकत असल्याचे दिसुन येते.

०८) १८२७ च्या मुंबई नियमन VIII च्या कलम ७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रमाणपत्र मालमत्तेवर कोणताही अधिकार देत नाही. परंतु, केवळ त्या व्यक्तीला सूचित करते जी सध्या तिच्या कायदेशीर व्यवस्थापनात आहे, असे प्रमाणपत्र देण्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा अधिकार अंतिमत: निश्चित होणार नाही किंवा त्याला हानी पोहोचणार नाही. १८२७ च्या मुंबई नियमन VIII अंतर्गत, न्यायालयाला फक्त हे विचारात घेणे आवश्यक आहे की वारस प्रमाणपत्राचा दावा करणारी व्यक्ती मृताचा वारस आहे की नाही आणि औपचारिकपणे त्याला मृताचा वारस म्हणून मान्यता देते.

०९) वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत **पै.अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचे कायदेशीर वारस असून सदर अर्जाला अन्य कोणीही हरकत घेतलेली नाही, त्यामुळे अर्जदार यांचेवर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. अर्जदार यांचा पुरावा विनाआव्हानात्मक आहे. म्हणुन, अर्ज मंजुर करुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र. **१) जावेद अहमद अब्दुल हाफिज मलीक व २) मोहम्मद अहमद अब्दुल हाफिज मलीक** हे मयत **पै.अल्लीमुन्नीसा अब्दुल हाफिज मलिक** यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या नावे वारस दाखला मिळकतीच्या चालू प्रचलित बाजारमुल्यावर आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा.

३) अर्जदार यांनी मुद्रांक शुल्क महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्टचे शेडयुल्ड एक मधील आर्टीकल १२ सह आर्टीकल १० अन्वये ३० दिवसांची आत भरावी.

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR

Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2026.07.01 11:13:45 +0530

पनवेल.  (व्ही. आर. हंगरगेकर)

दिनांक – ०१/०७/२०२६  सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल.